# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक २५.०८.२०२६ मंगळवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २५.०८.२०२६ रोजी मा. अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश—२० नागपुर, श्री. पंकज एस. पांडे साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. २४/२०२३ मधील, पोलीस ठाणे नंदनवन येथील अप. क्र. ४१४/२०२२ कलम ३१६, ४९८(अ), ३४ भा.दं.वि. या गुन्ह्यातील आरोपी १) अजगर अली मोहम्मद अली, वय ६४ वर्षे, २) शखीरा उर्फ सर्वरी बेगम अजगर अली, वय ६४ वर्षे, ३) शबनम परविन अजगर अली, वय २४ वर्षे, तिन्हीही रा. प्लॉट नं. ३४८, सद्भावना नगर, एनआयटी मैदान जवळ, नागपुर ४) रोशनी लईक अन्सारी, वय ३३ वर्षे, रा. वलनी, खापरखेडा, नागपुर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपी क्र. १ व २ व ४ यांना कलम ४९८ (अ) भा.दं.वि. कायद्यान्वये ०१ वर्षे कारावासाची शिक्षा व प्रत्येकी १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास प्रत्येकी ०२ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, आरोपी क्र. ३ ला कलम ४९८(अ) भा.दं.वि. कायद्यान्वये १८ महीने कारावासाची शिक्षा व १५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक ३०.१०.२०२२ चे १२.०० वा चे सुमारास, फिर्यादी बुशरा फरहीन सज्जाद अली, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. ३४८, सद्भावना नगर, एनआयटी मैदान जवळ, नागपुर ही तीचे सासरी असतांना व चार महीन्यांची गर्भवती असतांना, आरोपीतांनी संगणमत करून, फिर्यादीस हातबुक्कीने तीचे पाठीवर, पोटावर मारहाण केली व फिर्यादीचे पोटातील अर्भकाचा मृत्यु घडवुन आणण्यास कारणीभुत असल्याचे फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपींविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपींना दिनांक ०१.११.२०२२ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन पोउपनि. गुजर यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. डि.के. गवळी यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. वाय. वाय. हुमणे यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. अलका ढेंगरे यांनी काम पाहिले

**(कामगिरी)**

**१) हुडकेश्वर पोलीसांची कामगिरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक. ०९ गुन्हे उघडकीस, एकुण २४,५०,०००/—रू. चा मुद्देमाल हस्तगत.**

दिनांक ०८.०८.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक ०९.०८.२०२६ चे १३.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत सौभाग्यनगर, कविता कॅटरर्स मागे, राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती अंजली अरुणराव सातफळे वय ४० वर्ष हया आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह नातेवाईकाकडे म्हाळगीनगर येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्याचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती ७,२१,०००/—रू. चा मुद्देमाल

चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान हुडकेश्वर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व गुप्त बातमीदार मार्फतीने मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींना निष्पन्न केले व सापळा रचुन आरोपी १) शुभम उर्फ बिट्टु दिनेश मसराम, वय १९ वर्षे, रा. जयंती मैदान जवळ, रामबाग, गोलाईत चक्की जवळ, ईमामवाडा, नागपुर २) वेदांत नत्थुजी गावंडे, वय २० वर्षे, रा. जयंती मैदान, रामबाग, ईमामवाडा, नागपुर व एका विधीसंर्घग्रस्त बालकास ताब्यात घेवुन गुन्हेसंबंधाने विचारपुस केली असता, त्यांनी संगणमताने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यांचेकडुन गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी व विधीसंघर्षग्रस्त बालकाची सखोल विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत ईतर ०८ ठिकाणी घरफोडीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींकडुन एकुण ०९ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणुन त्यांचे ताब्यातुन सोन्याचे वेगवेगळे दागिने, सोन्याची लगड एकुण वजनी २०० ग्रॅम आणि एकुण ३०० ग्रॅम वजनाची चांदी असा एकुण किंमती २०,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच, पोलीस ठाणे येथील दाखल एका घरफोडीचे गुन्ह्यातील आरोपी नामे युगल उर्फ अभिषेक बंडुजी चन्नोडे, वय २५ वर्षे, रा. वकीलपेठ, नागपुर यास ताब्यात घेवुन, त्याचे ताब्यातुन घरफोडीचे गुन्ह्यातील ३० ग्रॅम सोन्याचा मुद्देमाल किंमती ४,५०,०००/—रू. चा जप्त करण्यात आलेला आहे. हुडकेश्वर पोलीसांनी घरफोडीचे १० गुन्हे उघडकीस आणुन एकुण २४,५०,०००/—रू. चा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. श्री. नरेंद्र हिवरे, सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. अनामिका मिर्झापुरे सपोनि. पपीन रामटेके, पोहवा. अविनाश श्रीरामे, बजरंग जुनघरे, सतीष मानके, मुकेश कन्नाके, पोअं. गौरव गजभिये, यशवंत डोंगरे, ओमप्रकाश मते, नितेश कडु, ऋषभ ठाकरे, हिमांशु पाटील व अभिषेक पांडे यांनी केली.

मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपुर शहर यांनी वरील गुन्हे उघडकीस आणनारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आज दिनांक २५.०८.२०२६ रोजी त्यांचे कार्यालयात बोलावुन त्यांना प्रशस्तीपत्रक देवुन, त्यांचा गौरव करून, त्यांना प्रोत्साहीत केले.





**२) जिवे ठार मारण्याच्या प्रयत्न करणारे गुन्हेगारांविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.**

दिनांक ०६.०८.२०२६ रोजी, फिर्यादी करण दिपक शर्मा, वय १७ वर्षे, रा. वकीलपेठ, ईमामवाडा, नागपुर व त्यांचे मित्र हे पोलीस ठाणे ईमामवाडा हद्यीत बास्केटबॉल मैदान येथे हजर असतांना, तेथे आरोपी क्र. १) वैभव राजेंद्र भिल्लम, वय २५ वर्षे, २) सुजल मंगेश पानतावणे, वय २५ वर्षे, दोन्हीही रा. सिरसपेठ, ईमामवाडा, नागपूर यांनी येवुन, फिर्यादीसोबत किरकोळ कारणावरुन वाद करून, फिर्यादी व त्यांचे मित्र यांचेवर शस्त्राने वार करू लागल्याने फिर्यादी व मित्र तेथुन पळाले असता, आरोपींनी त्यांना शिवीगाळी करून, आज इनको छोडेंगे नही, असे म्हणुन पाठलाग करून चंदननगर, साई मोटर्स समोर फिर्यादीस जिवे ठार मारण्याचे उद्देशाने तलवारीने छातीवर वार करून गंभीर जखमी केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे आरोपींविरूध्द कलम १०९(१), २९६, १२६(२), ३२४(२), ११८(१), ३५११(३), ३(५) भा.न्या.सं., सहकलम ४, २५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपींना अटक करण्यात आली होती.

गुन्ह्यातील आरोपी क्र. १ व ०२ यांचेवर जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, अवैद्य हत्यार बाळगणे, मारहाण करणे, अश्लील शिवीगाळ करणे, अंमली पदार्थ विक्री करणे, जबरी चोरी करने असे आरोपी क्र. १ याचेवर गंभीर स्वरूपाचे एकुण ०८ गुन्हे व आरोपी क्र. २ याचेवर एकुण १० गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरिकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(i)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा— १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मा. सहायक पोलीस आयुक्त, श्री. रोशन पंडीत (सक्करदरा विभाग) करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. जयवंत पाटील, सपोनि. अनिल कांबळे व मपोअं. प्रिया हिरवाणी यांनी केली.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील कुख्यात गुंड हद्दपार :—**

पोलीस आयुक्तालय, नागपूर शहर, परिमंडळ क्र. ०४ अंतर्गत पोलीस ठाणे बेलतरोडी हद्यीत न्यु पुनर्वसन, खापरी, तेलरांधेचे घराजवळ राहणारा गुन्हेगार ईसम नामे सुभान खान उर्फ निक्की खान, वय ३२ वर्षे याचेविरूध्द पोलीस ठाणे बेलतरोडी येथे गंभीर दुखापत करणे, मारपिट करणे, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दरोड्याची तयारी ईत्यादी गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता बेलतरोडी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १२/२०२६ दिनांक २४.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला.



सुभान खान उर्फ निक्की

**४) गुन्हेशाखा युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— तिन हद्दपार ईसमांना अटक.**

दिनांक २५.०८.२०२६ चे ०८.५० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे वाडी हद्यीत, हद्दपार ईसम तपासनींची विशेष मोहीम राबवित असतांना, हद्दपार ईसम १) अशोक उर्फ भोला मोहन निंबाळकर, वय ४१ वर्षे, रा. प्लॉट नं. ३८६, सोनबानगर, लावा, वाडी, नागपुर हा त्याचे राहते घरी मिळुन आला. पंचासमक्ष घरझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक मोठा चाकु किंमती ५००/—रू. चा मिळुन आला. तसेच, हद्दपार ईसम नामे २) नरेंद्र उर्फ नारू रामखिलावन पांडे, वय ३६ वर्षे, रा. रामजी आंबेडकर नगर झोपडपट्टी, कंट्रोल वाडी, नागपुर हा पोलीस ठाणे वाडी हद्दीत आठवा मैल बाजार परीसरामध्ये फिरतांना दिसल्याने त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवुन, त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक मोठा लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. तसेच, हद्दपार ईसम नामे ३) ईमरान खान सरफराज खान, वय ३८ वर्षे, रा. सिध्दार्थ चौक, आंबेडकर नगर, दत्तवाडी, नागपुर हा पोलीस ठाणे वाडी हद्दीत प्रकाश इन्स्टीट्युट गर्ल्स हॉस्टेलचे भिंतीलगत संशयीतरित्या दिसुन आल्याने, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक मोठा लोखंडी चाकु किंमती ५००/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपींचा अभिलेख तपासला असता, त्यांना पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हे हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे वाडी हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपींविरूध्द कलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १४२, १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. आरोपींना पुढील कार्यवाहीस्तव वाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. विनायक गोल्हे, पोहवा. राजेंद्र टाकळीकर, प्रविण भगत, अमोल भक्ते, पोअं. दिपक बावणकर, सुधिर तिवारी यांनी केली.




**५) नागपुर शहर पोलीसांचे तपासाला, ''सर्वोत्कृष्ठ अपराधसिध्दी'' पुरस्कार प्रदान :—**

सन २०२१ मध्ये नागपुर शहर अंतर्गत पोलीस ठाणे एमआयडीसी हद्यीत, लहान मुलाचे अपहरण करून, त्याचा खुन केल्याने, गुन्हा कलम ३६४(अ), ३०२ भा.दं.वि. अन्वये नोंद करण्यात आला होता. गुन्ह्यामध्ये कोणताही प्रत्यक्ष पुरावा नसतांना, केवळ परीस्थीतीजन्य पुरावा तसेच तांत्रीक व वैज्ञानिक पुराव्याचे आधारावर पोलीसांनी केवळ ११ दिवसांत सक्षम दोषारोपपत्र तयार करून, मा. न्यायालयात सादर केले होते. मा. न्यायालयाने नमुद गुन्ह्यातील आरोपीस दुहेरी जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. सन २०२३ मध्ये नमुद गुन्हा तपास

महाराष्ट्रातुन सर्वोत्कृष्ठ अपराधसिध्दी बक्षीसाकरीता पात्र झाला होता. आज दिनांक २५.०८.२०२६ रोजी गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे येथे मा. श्री. सुनिल फुलारी पोलीस महानिरीक्षक यांचे हस्ते पोलीस निरीक्षक श्री. दिनेश लबडे व पोअं. दिपक दासरवार (गुन्हेशाखा, नागपुर शहर) यांना मा. पोलीस महासंचालक यांचे प्रशस्तीपत्र देवुन, गौरविण्यात आले.







**<u>६) पोलीस आयुक्तालय अंतर्गत, गुन्हेगारांचा आदान–प्रदान कार्यक्रम संपन्न :–</u>**

दिनांक २५.०८.२०२६ चे ११.०० वा., मा. पोलीस आयुक्त श्री. विश्वास नांगरे पाटील, यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत विविध पोलीस ठाणे तसेच, गुन्हेशाखा येथे अटक व मा. न्यायालयाकडून पोलीस कोठडी प्राप्त असणारे एकूण १७ अटक आरोपींचे आदान–प्रदान हे अलंकार सभागृह, पोलीस मुख्यालय, नागपुर शहर येथे पार पडले. आदान–प्रदान कार्यक्रमाचा मुळ उद्येश हा पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोपींची ओळख पटावी, आरोपींची गुन्हे पध्दती समजण्यास मदत व्हावी तसेच, त्याचेवर कोणकोणते, किती व कुठे गुन्हे दाखल आहेत याबाबत माहितीचे आदान–प्रदान सुलभरितीने करता यावे असा होता. कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे, मा. पोलीस उपआयुक्त (डिटेक्शन) श्री. दीपक अग्रवाल व मा. सहायक पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) श्री. वैभव जाधव हे उपस्थित होते. तसेच आरोपींना अटक करणारे व हजर आणणारे संबंधीत पोलीस ठाणेंचे ठाणेदार, तपास पथक व एमओबी पथकातील अधिकारी व अंमलदार आरोपींसह हजर होते.

कार्यक्रम प्रसंगी मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांनी सीसीसी द्वारे चालणारी कार्यपध्दती त्याचप्रमाणे सिम्बा ॲप प्रणाली समजून घेवुन, हजर आरोपींची इत्यंभुत माहिती सिंबा प्रणालीमध्ये वेळीच अद्ययावत करण्याबाबत, त्याचप्रमाणे आरोपींचा डोजीअर फार्म, फिंगरप्रिंटस्, मोडस ऑपरेंडी याबाबत माहिती प्राप्त करुन संकलित करावी. अटक आरोपीतांवर योग्य त्या प्रतिबंधक कार्यवाही कराव्यात अशा हजर ठाणे प्रभारी व तपासी अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या.

**<u>(गुन्हे)</u>**

**<u>पोलीस ठाणे सिताबर्डी :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २३.०८.२०२६ चे १०.०० वा. ते दिनांक २४.०८.२०२६ चे ०९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत प्लॉट क्र. ३३२, हनुमान मंदीर जवळ, गल्ली नं. ०४, धरमपेठ, नागपूर येथे राहणारे फिर्यादी हमीद गुलाब खान, वय ६३ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परीवारासह नातेवाईकाचे घरी मुक्कामी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, किचनरूम मधील आलमारीतील रोख ७,००,०००/–रू. चोरून नेले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. यशराज पोमन ९०४९४०९४०२ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे नविन कामठी :–** दिनांक २५.०८.२०२६ चे १४.३५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, कळमना रेल्वे ब्रिजसमोर मुंबई–हावडा रेल्वे लाईन, पोल क्र. ११२०/१२ एन चे मध्यभागी एक अनोळखी ईसम वय अंदाजे ४० वर्षे वयाचे रेल्वेची धडक लागुन कटलेल्या मृत अवस्थेत मिळुन आले. मृतकाचे शव पुढील कार्यवाहीस्तव उपजिल्हा रूग्णालय कामठी येथे पाठविण्यात आले आहे. मृतकाची ओळख पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी रेल्वे पोलीस अंमलदार सनिराम चंदु पदा, वय ४४ वर्षे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. विनायक इंगळे ९२८४८८१०८३ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे हुडकेश्वर :–** मनोहरराव नामदेवराव भोयर, वय ६८ वर्षे, रा. प्लॉट नं. ३५५, न्यु म्हाळगी नगर, बेसा पॉवर हाऊस मागे, हुडकेश्वर, नागपूर हे दिनांक २१.०८.२०२६ चे ०४.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता सोबत लहान मुलगी सनाया वय ९ महिने हिचेसह कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– मध्यम, उंची– ५ फुट ५ इंच, केस– काळे पांढरे, अंगात– पांढरे रंगाचे फुल शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. ओळख– डोळ्यांवर चष्मा लावतात.

**२) पोलीस ठाणे सोनेगांव :–** अमोल सुर्यभान टोंगे, वय ४२ वर्षे, रा. मु. पो.– करेपना, तह. कोरपना, जि. चंद्रपुर हे दिनांक २१.०७.२०२६ रोजी नागपुर येथील एम्स हॉस्पीटल येथे त्यांचे गावातील मित्राला उपचारार्थ दाखल करण्याकरीता आले होते. परंतु, ते पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीतुन कोणाला काहीही न सांगता निघुन गेले. घरी परत गेले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट २ इंच, केस– काळे, अंगात– निळ्या रंगाचा शर्ट व खाकी रंगाचा पॅन्ट व पायात काळ्या रंगाची स्लीपर घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. ओळख– उजव्या हातावर 'अमोल' नांव गोंदलेले आहे.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :–** अय्युष भवानीशंकर शाहु, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. ४४, विठ्ठलवाडी, सुदर्शन नगर, हुडकेश्वर, नागपुर हा दिनांक १८.०८.२०२६ चे २०.०० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील महालक्ष्मी नगर येथुन कोणाला काहीही न सांगता निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट ३ इंच, केस– काळे, अंगात– पांढऱ्या रंगाची टि–शर्ट व लोअर पॅन्ट घातलेले आहे. भाषा– हिंदी बोलतो.


मनोहरराव


अमोल


अय्युष

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १८ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०३०२९/ २०१५ | कलम ३, ४, ७ पिटा ॲक्ट | १) सुरेश गोवर्धनदास अग्रवाल, वय ८० वर्षे, रा. बजेरीया, म्हसोबा मंदीर जवळ, गणेशपेठ. २) गोपाल गोविंद अग्रवाल, रा. टेंपल बाजार रोड, सिताबर्डी. ३) संजय उर्फ चेतन राधाकिसन अग्रवाल, रा. प्लॉट नं. ४७, वर्धमान नगर, नागपुर. ४) रमेश प्रल्हादराव अग्रवाल, रा. बजेरीया, गणेशपेठ, नागपुर. | २८.०८.२०२६ |
| २. | मा. १७ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४०१२१ /२००३ | कलम ३२६ भा.दं.वि. | १) रमेश सुर्यकांत म्हैसकर, २) मुकेश उर्फ काल्या प्रकाश इंगोले, दोन्हीही रा. वसंतराव नाईक झोपडपट्टी, सिताबर्डी, नागपुर. | २८.०८.२०२६ |
| ३. | मा. १६ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०३९८६/ २०१३ | कलम ४, २५ भा.ह. का. | आशिष कुलदिपसिंग बम्भोरीया, रा. नेताजी नगर, जगदीशचंद शर्मा चे घरी, नागपुर. | ०२.०९.२०२६ |
| ४. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०५०३८४ /२००२ | कलम २९४, ५०६(ब) भा. दं.वि. | जयेश किशोरीलाल धावडा, वय ५० वर्षे, रा. प्लॉट नं. ३०२, एमबिके बिल्डींग, वर्धमान नगर, नागपुर. | ०३.०९.२०२६ |
| ५. | मा. १५ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०५०१६० /२००५ | कलम ३२४ भा.दं.वि. | बंटी उर्फ कन्हैय्या शंकर मलीक, वय २८ वर्षे, रा. चिखली ले—आऊट, नविन झोपडपट्टी, कळमना, नागपुर. | ०३.०९.२०२६ |
| ६. | मा. १३ वे सहदिवाणी न्यायाधिश क. स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपुर. | ३०४०१४७ /२००० | कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.दं.वि. | १) शेख इलीयास शेख ईलाही, वय ३५ वर्षे, रा. वार्ड नं. ६, मंगळवारी, रामटेक, नागपुर. २) अश्पाक अहमद, वय ३८ वर्षे, रा. सेंट्रल लॉज, फवारा चौक, तहसिल, नागपुर. | ०५.०९.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**